**कारणे दाखवा नोटिस**

कृआआ-२०१८/प्र.म.कृ.सिं.यो./कंनोंनुक/प्र.क्र.०१/ ११८४ /फलो-४
कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,
पुणे - ४११ ००५, दि.११ डिसेंबर,२०१८
ई मेल आय डी agridrip2015@gmail.com

**विषय** : विक्री पश्चात सेवा केंद्रांवरील कंपनी नियुक्त अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या माहिती बाबत...

कृषि आयुक्तालयाचे आदेश क्र.कृआआ-२०१६/सुसिंयो/कंपनीनोंदणी/आदेश/तुषार/प्र.क्र.३८/८६३/फलो-४, दि.३ सप्टेबर २०१६ सोबतच्या परिशिष्ट- १ मध्ये समाविष्ट केलेल्या २५ तुषार सिंचन संच उत्पादक कंपन्यांच्या नोंदणीस, सन २०१६-१७ ते २०१८-१९ या तीन वर्षासाठी मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. परिशिष्ट-१ मधील अनु क्र.३० वर **मे.आकाश इंडस्ट्रिज, पटेल टींबर मार्केट, राजनंदनगाव, छत्तीसगड-४९१ ४४१.** यांना स्तंभ क्र.७ मध्ये नमुद केल्यानुसार राज्यातील एकूण १३ जिल्हयांसाठी मान्यता देण्यात आलेली आहे.

आपण सादर केलेल्या सन २०१८-१९ च्या नूतनीकरण प्रस्तावासोबत सहपत्रित केलेला कंपनी नियुक्त अधिकारी/कर्मचाऱ्यांचा तपशील पडताळणीसाठी संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या नावासमोर नमूद दूरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांकांवर संपर्क साधला असता, कंपनीने सादर केलेल्या यादीतील एकमेव कर्मचारी श्री.अमृत लाल हे छत्तीसगड राज्यात वास्तव्य करणारे आहेत. तसेच छत्तीसगड राज्यातच कार्यरत आहेत. अशी माहिती संबंधित कर्मचाऱ्याकडून प्राप्त झाली आहे.

तथापि आपण सादर केलेल्या तपशीलानुसार सदर कर्मचाऱ्याच्या नावासमोर महाराष्ट्रातील जिल्हे नमूद केले आहेत.

उपरोक्त नुसार सन २०१८-१९ मध्ये नूतनीकरणासाठी आपण कृषि आयुक्तालयास सादर केलेली माहिती चुकीची अथवा खोटी आढळून आल्यामुळे आपले कंपनीस दिलेले नोंदणीआदेश रद्द करणेबाबत शासनास का प्रस्तावित करण्यात येऊ नये या बाबतचा खुलासा सदरची नोटिस मिळालेपासून १० दिवसांच्या आत सादर करावा. अन्यथा खुलासा सादर न केलेस नियमा नुसार पुढील कार्यवाही करणेत येईल. याची नोंद घ्यावी.

**संचालक फलोत्पादन**
कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे-५

**प्रति,**

**मे.आकाश इंडस्ट्रिज,**
**पटेल टींबर मार्केट,राजनंदनगाव,**
**छत्तीसगड-४९१ ४४१.**
ई मेल आय डी mr.jivrajpatel@rediffmail.com